रे.क.नं. १६९/२०२२
लिला शिंगे वि विजय बनकर
नि.नं.५७/सी सोबत

**वादी तर्फे साक्षीदार क्र २- यांचा उलटतपास प्रतिवादीतर्फे वकील एस एस खोत यांचेमार्फत पुढे सुरू**

०५. मी पूजा अर्चाचे काम करतो. हे म्हणणे खरे आहे की वाडी रत्नागिरी हे गाव जोतिबा देवाचे केदारलिंग देवस्थान म्हणून ओळखले जाते. हे म्हणणे खरे आहे की ते मंदिर अतिप्राचीन मंदिरापैकी एक हिंदू देवस्थान मंदिर आहे. हे म्हणणे खरे आहे की ते मंदिर हिंदू देवस्थानातील पवित्र मंदिर असून देश विदेशातून भाविक लोक देवाच्या दर्शनाकरीता येत असतात. हे म्हणणे खरे आहे की पूर्वीच्या पुरागामी शाहू महाराज यांच्या संस्थानामधील हे सदरचे मंदिर आहे. हे म्हणणे खरे आहे की सदर मंदिराचे व्यवस्थापन हे पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीकडे आहे. हे म्हणणे खरे आहे की सदर मंदिरामध्ये प्रथम हक्क मानाचे पुजारी जे होते त्यांचे वारस हे पुजा करतात. हे म्हणणे खरे आहे की त्या पुजेबाबत वर्षाचे आठवडा पाळीपत्रक असते. हे म्हणणे खरे आहे की ज्या वेळेस त्या मंदिराचे पुजारी मयत होतात त्या वेळेस त्यांचे वारस हे पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीकडे त्यांचे नावाचे रजिस्टेशन होते. हे म्हणणे खरे आहे की त्या कायदेशीर वारसांची नावे ही तहसिलदार यांचेकडे दिलेनंतर त्यांचे नावाच्या नोंदी करण्याकरीता पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीकडे पाठविण्यात येतात. हे म्हणणे खरे आहे की त्या मंदिरामध्ये जे पुजारी काम करतात ते सर्व पुजारी हे हिंदू धर्माचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की हिंदु वारसा कायदयाप्रमाणे त्या वारसांच्या नोंदी केल्या जातात. साक्षीदार स्वताहून सांगतात की देवस्थानाच्या वटहुकुमाप्रमाणे करतात. हे म्हणणे खरे आहे की देवस्थानाचे वटहुकुम म्हणजेच शाहू महाराज यांचे काळातील वटहुकुम. हे म्हणणे खरे आहे की देश स्वतंत्र झाल्यानंतर शाहू महाराजांचे राजेशाही संस्थान हे देशाच्या स्वराज्यामध्ये विलीन झाले. हे म्हणणे खरे आहे की सदर मंदिरावर शाहू महाराजांचे जे नियंत्रण होते ते आता पश्चिम महाराष्ट्र

देवस्थान समिती यांचेकडे गेले आहे. हे मला माहित नाही की देश स्वतंत्र झाल्यानंतर हिंदू लोकांचा हिंदू वारसा कायदा  हा लागू झाला.

प्रश्न- देश स्वतंत्र झाल्यानंतर हिंदु वारसा कायदा लागू झाला आणि शाहू महाराजांच्या काळातील संस्थानाचे वटहुकुम हे रद्द करण्यात आले याबाबत तुम्हाला माहिती आहे का ?

उत्तर- जोतिबा देवस्थानाचे जे वटहुकुम असतात आणि वंशपरंपरानुसार वारसा ठरवला जातो.

हे म्हणणे खरे आहे की देश स्वतंत्र झाल्यानंतर हिंदु वारसा कायदा लागू झाला आणि शाहू महाराजांच्या काळातील संस्थानाचे वटहुकुम हे रद्द करण्यात आले याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की जोतिबा देवस्थान पवित्र देवस्थान असल्याने त्या मंदिरामध्ये जात, भेद यावरून कोणत्याही भाविकांचे  अथवा अन्य कोणालाही दर्शन हे नाकारले जात नाही.

उलटतपास वेळेअभावी तहकूब.

सही/-

दि. १८/०६/२०२६. **( एस.व्ही.जंगमस्वामी )**

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पन्हाळा